लोकसत्ता | विविधा
WWW.LOKSATTA.COM
पुणे, बुधवार, ३ जानेवारी २०१८

# एम. के. रणजित सिंह यांना वसुंधरा सन्मान जाहीर

प्रतिनिधी, पुणे



एम. के. रणजित सिंह



आरती कुलकर्णी



दीपक आपटे

**किर्लोस्कर आणि** वसुंधरा क्लबतर्फे केंद्रीय वन आणि वन्यजीव खात्याचे माजी उपचसिव आणि वन्यजीव संवर्धन कायद्याचा मसुदा तयार करणारे एम. के. रणजित सिंह यांना यंदाचा वसुंधरा सन्मान जाहीर झाला आहे. पर्यावरण संवर्धन क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकार आरती कुलकर्णी यांना इको जर्नालिस्ट आणि 'बी. एन. एस. एस.- इंडिया'चे अध्यक्ष (बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी) डॉ. दीपक आपटे यांना 'ग्रीन टीचर' पुरस्कार जाहीर झाला आहे.

बालगंधर्व रंगमंदिर येथे गुरुवारी (४ जानेवारी) प्रसिद्ध दिग्दर्शक एस. नल्लमुथ्थु यांच्या हस्ते सायंकाळी सहा वाजता १२ व्या किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. वाघांवरील चित्रपटांसाठी ओळखले जाणारे नल्लमुथ्थु यांचा 'द वर्ल्डस् मोस्ट फेमस टायगर' हा महोत्सवाच्या उद्घाटनाचा चित्रपट आहे. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (५ जानेवारी) घोले रस्त्यावरील पं. जवाहरलाल नेहरु सांस्कृतिक भवन येथे भरविण्यात येत असलेल्या इको बझारचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट आणि गौरी किर्लोस्कर यांच्या हस्ते दुपारी बारा वाजता, तर बालगंधर्व कलादालन येथे सायंकाळी पाच वाजता भरविण्यात येत असलेल्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन बंगळुरू येथील प्रसिद्ध छायाचित्रकार गणेश शंकर यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर गणेश शंकर यांचे 'माय एनकाउंटर विथ कॅमेरा' हे विशेष दृक-श्राव्य सादरीकरण होईल, अशी माहिती किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे अध्यक्ष माधव चंद्रचूड आणि निमंत्रक वीरेंद्र चित्राव यांनी मंगळवारी दिली. महोत्सवात विविध देशांतील १५५ लघुपट आणि माहितीपट दाखविण्यात येणार आहेत. प्रसिद्ध वन्यजीव दिग्दर्शक गुरमीत सपाल यांचे तीन चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. महोत्सवांतर्गत 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालयांना रविवारी (७ जानेवारी) ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात येणार आहे. पं. जवाहरलाल नेहरु सांस्कृतिक भवन येथे सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. सोमवारी (८ जानेवारी) बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या महोत्सवाच्या समारोप सत्रात प्रसिद्ध उद्योजक अतुल किर्लोस्कर यांच्या हस्ते वसुंधरा सन्मान, इको जर्नालिस्ट आणि ग्रीन टीचर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. वातावरण महोत्सवात सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार मिळालेल्या 'सीड : द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटाने महोत्सवाचा समारोप होणार आहे.